
Peer Reviewed Journal

ISSN 2278 - 4284





# LOKNAYAK

## Interdisciplinary International Journal For Innovative Research & Evaluation

This Edition Dedicated To Woman

VOLUME - XX
MARCH - 2016



Peer Reviewed International Journal ISSN 2278-4284



# LOKNAYAK

## Interdisciplinary Journal For Innovative Research & Evaluation

***This Edition Dedicated To Women***

March -2016
Volume - xx

Editorial Board

***Guest Editor***

***Asso. Prof.Dr. Durgesh Kunte***

Asst. Prof. Dr. Santoshkumar Gajale
HOD Hindi
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asso. Prof. Dr. Lata J. Waghela
HOD Home Econmics
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asso. Prof.Dr. Durgesh Kunte
Physical Education Director
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asst.Prof. S.D. Telang
HOD Econmics
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asso. Prof. Dr. Kavita Tated
HOD History
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asso. Prof. Dr. A,S, Deshpande
HOD Music
L.B. Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asst. Prof. Dr. Sudha Khadke
HOD Sociology
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

Asso. Prof. Darshana Sayam
HOD Sanskrit
L.B.Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | नारी प्रतिमा के संदर्भ में जैन अभिलेखों का सांस्कृतिक अध्ययन | प्रा. डॉ. कविता राजेंद्र तातेड | 101- 107 |
| 25 | भारतीय समाज से नारीवादी विचारधारा का अनुशीलन | प्रा. राजेंद्र एम. तातेड | 108- 112 |
| 26 | यशपाल के उपन्यासों में नारी के विविध रूप | डॉ. किशोर गिरडकर | 113- 115 |
| 27 | विश्वसुधारक ग्रंथ - ग्रामगीता | प्रा.डॉ.मनोज सु जोशी | 116-120 |
| 2S | हिन्दी कथा साहित्य में स्त्री विमर्श | प्रा. शेख परवीन बेगम शेख इब्राहीम | 121- 123 |
| २९ | बौध्द एंव जैन धर्मग्रंथों में पेक्षागृह का स्थान | प्रा. निलेश अर्जुनराव भगत | 124- 126 |
| 30 | Emancipation of The Women | Dr. Suwarna S. Athawale | 127- 128 |
| 31 | Women Entrepreneurs in India: Problems & Remedies | Nitin P. Singhavi | 129-131 |
| 32 | Ecocriticism and Indian Writing in English | Dr. Vinay Bhogle | 132- 133 |
| 33 | Empowered Women, Empowered Nation | D. K. Khupse | 134-135 |
| 34 | "Digital India" – Change of India's Image. | *Dr.Pankaj S. Vishwakarma* | 136-139 |
| 35 | मिळून तीघीजणी (आश्वलायन गृह्यसूत्रातील ब्रह्मवादिन | *डॉ. जयश्री अनिरुध्द सकळकळे.* | 140-145 |
| 36 | "यवतमाल शहर के माध्यमिक विद्यालय के किशोरवयीन छात्रों में यौन शिक्षा विषयक जागृती एक अनुशीलन" | प्रा. डॉ. अंशु रा. साहु | 146-149 |
| 37 | अभिशाप्त स्त्री जीवन की करुण गाथा- 'दोहरा अभिशाप' | डॉ. संतोष विजय येरावार | 150-153 |
| 38 | प्राचीन मातृ संस्कृती मधील लघुउद्योगासंबंधी संशोधने आणि विविध कला | प्रा. रंजना जिवने (मेंढे) | 154-156 |
| 38 | महिलांसाठी प्राणायाम, आहार व आरोग्य | प्रा. डॉ. बी. एम. सावरकर | 157-158 |
| 38 | शारीरिक शिक्षण महाविद्यालयीन विद्यार्थीनी आणि अभियांत्रीकी महाविद्यालयीन विद्यार्थीनी यांच्यातील शारीरिक क्षमतेचे तुलनात्मक अध्ययन | विद्या हेमंत पोलादे | 159-163 |
| 38 | महात्मा बसवेश्वरांचा ईश्वरवादी कार्यात्मक विचार | प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 164-166 |

# महात्मा बसवेश्वरांचा ईश्वरवादी कार्यात्मक विचार

प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड

भारतात समाज प्रबोधनार्थ कार्य करणाऱ्या अनेक चळवळी उदयास आल्या. यातील सर्व चळवळींनी हाताळलेल्या अनेक समसमान विषयापैकी ईश्वर हा एक विषय आहे. यातील काहींनी ईश्वर आहे किंवा नाही ? याबाबत भाष्य करतांना मौन बाळगले. उदा. महात्मा गौतम बुध्द. तर बऱ्याच चळवळींनी ईश्वर नाकारला उदा. आंबेडकरी चळवळ. शरण चळवळ, वारकळी चळवळींनी मात्र ईश्वर स्विकारला. परंतु त्या भोवतीच्या कर्मकांडाना नाकारले.

भारत हा अनेक देव देवतांना मानणारा पृथ्वीवरील एकमात्र देश असावा. या देशात संगणकाच्या युगातही संगणकाचे बटन चालु करण्यापुर्वी त्याची कर्मकांडरुपी पुजा केली जाते. ईश्वरीय अंवडंबरांना प्रधान माणुन स्वत:ची उपजीविका भागवणारा एक वर्ग मंदिर, मस्जिद, चर्च आणि गल्ली - बोळात ठाण मांडुन बसला आहे.

बसवेश्वरांचा ईश्वरवादी कार्यात्मक विचार ग्रंथप्रामाण्यवादी नसुन अनुभावप्रामाण्य होता. त्यास मानवी कलयाणाचा स्पर्श होता. मानवी विकासासाठी ईश्वर नसुन, ईश्वर हे फक्त व्यक्तीच्या अध्यात्मीक उन्नतीचे माध्यम आहे. ईश्वरावरील श्रध्दा तपासायला लावणारी सनद मांडली. विज्ञानवाद व उपयोगिता वादाच्या आधारावर ईश्वरी तत्वज्ञान मांडले. बसवेश्वरांची ईश्वरवादी संकल्पना नास्तिक नसुन आस्तिक आहे. सर्व महान पुरुषांप्रमाणेच महात्मा बसवेश्वर देखील आपले जीवन चंदनाप्रमाणे झिजवले. समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. एकंदर विश्वाच्या आरंभापासूनच ईश्वराविषयीचे कुतुहल माणसात होते व आजही आहे. ईश्वर ही कल्पना कशी उदयास आली ? त्याचे स्वरुप कसे असेल ? भारतीयांच्या मनात ईश्वर, ईश्वरी कर्मकांड व चमत्काराविषयीचे उत्सुक्ता याविषयी पडलेल्या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न इतर देशाप्रमाणे भारतात अधिक झाला आहे. चार्वाकापासुन ते महात्मा फुले पर्यत अनेकांनी प्रयत्न केले. बसवकालीन मंदीर व्यवस्था, व देवाच्या कर्मकांडी स्वरुपाला ऊत आला होता. मंदिराला अवास्तव असे महत्व प्राप्त झाले. प्रत्येक राजा वेगवेगळया भागात मंदिराचे बांधकाम करी. सम्राट अशोकाने मात्र मंदिराऐवजी बौध्द संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या शिल्पकलेचा अविष्कार केला. जनता सुध्दा कर रुपाने मंदिरासाठी निधी देत असत. भारतातील बहुतांश मंदिरात संपत्ती जमा होऊ लागली. मंदिरात असणारा ईश्वर मानवास मोक्ष मिळवुन देतो. त्यांच्या पुजनाने, कृपेने सर्व सुखप्राप्त होते. याविचारातुन उपास - तपास, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, नवस करण्याची प्रथा रुढ झाली. पुत्रप्रापती, ऐश्वर्य, आरोगय, सुख, संपत्तीच्या प्राप्तीसाठी अनेक व्रत व नवस जनता करु लागली. लोकांच्या ईश्वर विषयक या भावनांचा गैरफायदा होणाऱ्या वर्गाने लोकसमजुती अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला. ज्यातुन देवदासी, सतिप्रथा, बळीप्रथा निर्माण झाली.

प्रत्येक व्यक्तिचा ईश्वर वेगळा. त्याला पुजण्याची रित वेगळी. प्रसन्न करुन घेण्याची प्रार्थना वेगळी अशा अवस्थेत बसवेश्वरी काळातील समाज गुरफटला होता. त्यातुन त्यास स्वविकास, ज्ञानप्राप्ती,

ISSN 2278-4284

विवेकी जगणे, अर्थप्राप्ती करण्यास वेळच मिळत नसत. ग्रंथ व पुरोहित प्रामाण्यतेने त्यांच्या ईश्वरी श्रध्दांचा व्यवसाय करुन स्वत:चे पोट भरण्याचा मार्ग तयार केला.

अशा विचित्र परिस्थितीत वसवेश्वरांचा जन्म झाला. महात्मा वसवेश्वरांनी समाजाची इश्वराविषयीची ही प्रचंड आकर्षण ओळखले. ईश्वर नाही असे म्हणुन लोकभावनांना भडकावण्याचे कार्य न करता, ईश्वराविषयीच्या स्वरुपात आमुलाग्र बदल केला.

देवासंबंधी यथार्थ कल्पना मांडली. संस्कृत ग्रंथात लिहिलेल्या ईश्वराचे पाखंडी रुप स्पष्ट केले. ३३ कोटी देवाची संकल्पना झिडकारली, ईश्वरी संकल्पनेसोबतच्या, कर्मकांड, अज्ञान, उपास - तापास, नवस, व्रतवैकल्य, दगड देव, माती देव, सुप देव, कंगवा देव, अग्नी देव, ताईत देव इ. बहुदेवोपासना नाकरताना बसवण्णा म्हणतात. **एकचि तो देव, शिवभक्तासाठी, कोटि नामे खोटी, तयासाठी, पति तो एकचि, पतिव्रतेसाठी, येर वार्ता खोटी, तियेसाठी कुडलसंगमदेवा ! प्रिय आमुचा एक पूजिता अनेक, नाक कापी वावडे उचिष्ट, परपुरुषाचे ते तसे परदेवांचे, शरणांशी.**

देव विश्वंभर असून तो सर्वत्र ओतप्रोत भरला आहे. तशाच तो आपल्या शरीरातील मन, भाव व प्राण यांना आधारभूत आहे. देव निराकार (निर्गुण) व साकार (सगुण) या दोन्ही रुपात असून दोन्ही एकच होत. म्हणुन बसवण्णा म्हणतात देव एक, नावे अनेक. बसवेश्वरांनी एकदेवोपासनेचा सिध्दांत मांडून त्याची उपासना करायला सांगितली. बसवेश्वरांचा देव कर्मकांडी नाही. कष्ट न करता कांहीही मागितले तर देव नाही. मागणारा भिकारी, श्रिमंत किंवा पुजारी असो त्यास देत नाही. कायकातच ईश्वर पहाणाऱ्यास दिल्याशिवाय रहात नाही. बसवेश्वरांच्या देवाला दुध, तुप, दही, तेल, भात, ताक, साखर, बेल, फुल, उदबत्ती, तांदुळ, अगरडा, हाराळी, वात, फुलवात, माळ, वोरमाळ इ. साधने लागत नाही. **ज्याने आपले तन आणि मन श्रमपुर्वक झिजवले. श्रमाची पुजा करुन ज्यांने शिवाची पुजा केली, श्रमिकाच्या झोपडीला जो कैलास मानतो, ज्याची वाणी तशी करणी, कुडलसंगमदेवा तोच जगदगुरु झाला.** बसवेश्वरांचे हे वचन शिवाची पुजा कशी करावी ते सांगते. बसवेश्वरांनी तत्काळातील जनतेची इश्वरी उपासनेची भुक घरवसल्या भागवली. इष्टलिंगाच्या माध्यमातुन बसवेश्वरांनी वैदिक ईश्वरी संकल्पनेला पर्याय दिला. जो कर्मकांडी नाही. व्यक्तिला गुलाम बनवत नाही. त्याच्या श्रध्दा विवेकी बनवतो. दलाल संस्कृती हनन करतो.

पुरोहितांच्या मार्फत मंदिर संस्कृतीत घडणारे, सर्व पाप कर्म थांबवते. केंव्हाही, कोठेही, कधीही. कशाही प्रकारच्या ईश्वरी पुजेची भूक इष्टलिंगाच्या माध्यमातुन भागवता येते. अपमान, शोषण नाही. सन्मान देतो, वाढवतो. स्वत्व जागृत करतो. आंतरिक शक्तीचा विकास करतो. इष्टलिंगाच्या संदर्भात बसवेश्वर म्हणतात. अंतरंगात असणारा निरअवयव लिंग हे साकार करुन श्री गुरुस्वामी करस्थळी आणुन दिला. आपल्या डाव्या हाताच्या तळहातावर काळी कांती असलेला इष्टलिंग ठेवावा. त्याकडे कटाक्ष नजरेने भल्या पहाटे पाहुन शिवयोग करावा. ज्याने बुध्दी विकसित होते. स्मरणशक्ती वाढते. कांती, काया, उजळ होते. प्रसन्नता वाढते. सदवर्तन, सदाचारी मनुष्य बनतो. सदैव माझा ईश्वर माझ यासोबत आहे हा भाव सदभक्तात निर्माण होते. जेणेकरुन त्याच्या आचरणात सदाचारीवृत्ती विकसित होते. जगविस्तार, नको विस्तार, विस्तारातीत असे तवविस्तार, पाताळतीत तवश्रीचरण, ब्रह्मांडातील असे तवश्रीमुकूट, अप्रमाणा, अगम्य, अगोचर, अप्रतिम इष्टलिंग, हे कुडलसंगमदेवा इवलासा याचा अर्थ

बसवेश्वरांचा देव सगळीकडे आहे. तो प्रकोपकारी नाही. भक्ति , पुजा केली नाही म्हणुन नाराज होणार नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बसवेश्वरांचा ईश्वर विषयक सिध्दांत सांगतांना म्हणतात **लाखेचा देव त्याले अग्नीचे भेव, मातीचा देव त्याले पाण्याचे भेव, सोन्या चांदीचा देव त्याले चोराच भेव, देव अशांना भेटायचा नाहीरे देव बाजारचा भाजीपाला नाहीरे.**

संदर्भ :

१) बसवसिध्दांत - सपांदक, प्रा.बाबुराव माशाळकर व प्रा.डॉ.म.ई. तंगावार - महाराष्ट्र बसव परिषद,भालकी

२) महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान - डॉ.वेदप्रकाश डोणगावकर, स्वाती प्रकाशन, पुर्णा.

३) समग्र क्रांतीकारी बसवेश्वर - डॉ.सुर्यकांत घुगरे, श्री बसवेश्वरपिठ, कर्नाटक विश्व विद्यालय धारवाड.

४) बसवेश्वर - काशिनाथ अंबलगे, लोकभारती प्रकाशन इलाहाबाद.